ePaper

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सलग चौथ्यांदा रिंगणात!



वर्ष - 8 । अंक -104 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 22 ऑक्टोंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- दिल्ली कॅपिटल्स पंतला सोडणार?
- राहुलचा कसोटी क्रिकेटला अलविदा?
- गडचिरोलीत पाच नक्षल्यांना कंठस्नान!
- बिश्नोईची केवळ तुरुंगातच चौकशी

## अजित पवारांविरोधात लढणाऱ्याचं डिपॉझिटही होत जप्त

# अजितदादांना आता पुतण्या देणार टक्कर?

### बारामतीत पुन्हा एकदा काका विरुद्ध पुतण्या अशी लढत होणार

। पुणे । महाईन्यूज

**लोकसभेप्रमाणेच बारामती विधानसभेकडे आता संपूर्ण राज्यासह देशाचे लक्ष असणार आहे. पाच वेळा उपमुख्यमंत्री राहिलेल्या अजित पवारांच्या विरोधात चक्क त्यांचेच पुतणे युगेंद्र पवार दंड थोपटण्याची शक्यता आहे. असे झाल्यास बारामतीत पुन्हा एकदा काका विरुद्ध पुतण्या अशी लढत पाहायला मिळू शकते.**

बारामती शहरात अजित पवार यांच्या प्रचार यंत्रणेकडून त्यांच्या नावाच्या प्रचाराच्या वाहनांचा ताफा तयार करण्याचं काम वेगानं सुरू आहे. या प्रचार रथावर विधानसभा निवडणुकीचे उमेदवार म्हणून अजित पवार यांच्या नावाचा उल्लेख आहे. त्यामुळे आता बारामतीतून राष्ट्रवादीचे उमेदवार अजित पवार हेच असतील हे आता स्पष्ट झालंय.

यापूर्वी अजित पवारांनी तब्बल सहा वेळा बारामतीचं नेतृत्व केलंय आता सातव्यांदा अजित पवार बारामतीच्या मैदानात उतरलेत. येत्या 28 तारखेला अजित पवार उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. आजपर्यंत अजित पवारांच्या विरोधात लढणा-याचं डिपॉझिट जप्त झालंय.

मात्र, बारामतीची यंदाची लढाई अजित पवारांसाठी तितकी सोपी नसणार आहे. यंदा अजित पवारांच्या विरोधात शरद पवार युगेंद्र पवारला निवडणुकीच्या मैदानात उतरवण्याची शक्यता आहे.




लोकसभेच्या निवडणुकीत अजित पवारांनी सुनेत्रा पवारांना सुळेंच्या विरोधात मैदानात उतरवलं. मात्र मोठ्या मताधिक्याने सुनेत्रा यांना पराभवाचा सामना करावा लागला. सुप्रिया सुळे यांना बारामती विधानसभा मतदारसंघातून 48 हजारांचे लीड मिळालं होतं. लोकसभेला काकांनी पुतण्याला आसमान दाखवलं. आता विधानसभेतही काकांच्या विरोधात पुतण्या दंड ठोकून उभा राहण्याची शक्यता असल्यानं बारामतीत लोकसभेनंतर विधानसभेतही पवार विरुद्ध पवार असा संघर्ष होण्याची शक्यता आहे.



### कोण आहेत युगेंद्र पवार?

शरद पवारांचे नातू
अजित पवारांचे सख्खे बंधू श्रीनिवास पवार यांचे पुत्र
फलटण तालुक्यातील शरयू खाजगी साखर कारखान्याचं काम पाहतात
विद्या प्रतिष्ठान शैक्षणिक संस्थेचे खजिनदार

---

## शिरूरमधील लढत दोन 'राष्ट्रवादीं'मध्ये?

### मतदारसंघावरून महायुतीतील भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

जिल्ह्यातील 'शिरूर' विधानसभा मतदारसंघावरून राष्ट्रवादी (अजित पवार), भाजप आणि शिवसेना (शिंदे) यांच्यात जोरदार रस्सीखेच सुरू असतानाच, या मतदारसंघात नाट्यमय घडामोडी घडण्यास सुरुवात झाली आहे. शिरूरमधील शिवसेना (ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख आणि इच्छुक उमेदवार माऊली कटके




यांनी सोमवारी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षात प्रवेश केला. कटके यांच्या पक्ष प्रवेशामुळे शिरूरमधील राजकीय समीकरणे बदलली असून, कटके राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे संभाव्य उमेदवार असतील, अशी चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे शिरूरमधील लढत 'राष्ट्रवादी' विरोधात 'राष्ट्रवादी' अशी होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील शिरूर मतदारसंघावरून महायुतीतील भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू आहे. विधानसभा निवडणुकीत हा मतदारसंघ भाजपला हवा आहे. लोकसभा निवडणुकीतही शिरूर मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी भाजपने तयारी केली होती.

### कटके संभाव्य उमेदवार?

महाविकास आघाडीचा विचार करता, राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे अशोक पवार विद्यमान आमदार आहेत. त्यांना कोणाचे आव्हान असणार, याची चर्चा सातत्याने होत आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेला शिवसेनेचे (ठाकरे) जिल्हाप्रमुख माऊली कटके निवडणूक लढविण्यास इच्छुक होते. शिरूरची जागा शिवसेना (शिंदे) पक्षाकडे जाईल, अशी चर्चा सुरू झाली असतानाच कटके यांनी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षात प्रवेश केला. त्यामुळे ते संभाव्य उमेदवार असतील, अशी चर्चा सुरू झाली आहे.

# महाराष्ट्रात फक्त गुलाबी वादळ!

## अजित पवारांनी जाहीर केले 27 स्टार प्रचारक

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री अजित पवारयांनी महाराष्ट्रात फक्त गुलाबी वादळ घोंघावणार आणि राष्ट्रवादीच्या घड्याळाचे काटे जोमाने फिरणार अशी पोस्ट करत २७ स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी जेमतेम २९ दिवस उरले आहेत.**

महायुतीमधल्या भाजपाने ९९ जागा जाहीर केल्या आहेत. तर अजित पवार यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे.१) अजित पवार २) प्रफुल पटेल ३) सुनील तटकरे ४) छगन भुजबळ ५) दिलीप वळसे पाटील ६) धनंजय मुंडे ७) हसन मुश्रीफ ८) नरहरी झिरवाळ ९) आदिती तटकरे १०) नितीन पाटील ११) सयाजी शिंदे १२) अमोल मिटकरी १३) जल्लाउद्दीन सैय्यद १४) धीरज शर्मा १५) रुपाली चाकणकर १६) इद्रिस नायकवडी १७) सूरज चव्हाण १८) कल्याण आखाडे १९) सुनील मगरे २०) महेश शिंदे २१) राजलक्ष्मी भोसले २२) सुरेखा ठाकरे २३) उदयकुमार आहेर २४) शशिकांत तरंगे २५) वासिम बुऱ्हाण २६) प्रशांत कदम २७) संध्या सोनवणे अशी या स्टार प्रचारकांची नावं आहेत. अजित पवार यांनी गुलाबी जॅकेट आणि गुलाबी गाड्या अशी प्रचाराची थीम घेतली आहे. साधारण मागच्या काही महिन्यांपासून त्यांचे राज्यभरात दौरे सुरु आहेत. लाडकी बहीण योजना कधीही बंद केली जाणार नाही असंही अजित पवार यांनी जाहीर केलं आहे. तसंच महायुतीचं सरकार येणार हा विश्वासही व्यक्त केला आहे. विकासाचा राष्ट्रवादी विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात येत आहे, असंही अजित पवार यांनी म्हटलं आहे. निवडणुकीच्या तोंडावर अजित पवार ( Ajit Pawar ) यांनी जी स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे ते प्रचारक राष्ट्रवादीचा प्रचार करताना दिसतील. महाराष्ट्रातली विधानसभा निवडणूक २० नोव्हेंबरला होणार आहे. एकाच टप्प्यात ही निवडणूक पार पडणार आहे. तसंच २३ नोव्हेंबरला निवडणुकीचा निकाल लागणार आहे. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना या निवडणुकीत होणार आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगलं यश मिळालं. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास दुणावला आहे. तर दुसरीकडे हरियाणा या ठिकाणी मिळालेल्या विजयामुळे भाजपानेही महाराष्ट्रात याच विजयाची पुनरावृत्ती होईल.



### स्टार प्रचारकांची यादी जाहीर

असं म्हटलं आहे. आता काय होणार ते २३ नोव्हेंबरला स्पष्ट होणार आहेच. मात्र अजित पवारांनी खास पोस्ट करत स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे.लाडकी बहीण योजना कधीही बंद केली जाणार नाही असंही अजित पवार यांनी जाहीर केलं आहे. तसंच महायुतीचं सरकार येणार हा विश्वासही व्यक्त केला आहे. विकासाचा राष्ट्रवादी विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात येत आहे, असंही अजित पवार यांनी म्हटलं आहे. निवडणुकीच्या तोंडावर अजित पवार यांनी जी स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे ते प्रचारक राष्ट्रवादीचा प्रचार करताना दिसतील.

# पुन्हा सरकार आणण्यासाठी महायुतीचे सर्व कार्यकर्ते सज्ज

## महायुतीच्या विजयाचा निर्धार : महायुतीची पुणे जिल्हा समन्वय समितीची बैठक संपन्न

।पुणे महाईन्यूज। प्रतिनिधी।

**राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार येणार असून, लोकसभेप्रमाणे विधानसभा निवडणुकीसाठी ही महायुतीचे कार्यकर्ते सज्ज आहेत, असा विश्वास महायुतीच्या समन्वय समितीच्या बैठकीत सर्व प्रमुख नेते आणि पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीची समन्वय समितीची बैठक आज कोथरुड मधील अंबर हॉल येथे संपन्न झाली.**



यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर, आ. राहुल कुल, भाजपा पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, ग्रामीणचे अध्यक्ष शरद बुट्टे पाटील, वासुदेवनाना काळे, शिवसेनेचे किरण साळी, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदीपदादा गारटकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहर अध्यक्ष दिपक मानकर, रिपाइं आठवले गटाचे संजय सोनावणे, दिगंबर दुगडि, दिपक मिसाळ, यमराज खरात, समन्वय समितीचे पुणे महानगर समन्वयक संदीप खर्डेकर यांच्या सह महायुतीचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम केले. त्यामुळे लोकसभेप्रमाणे विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार आणण्यासाठी महायुतीचे सर्व कार्यकर्ते सज्ज आहेत. असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. नामदार चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, राज्यात महायुतीची मोठी ताकद आहे. त्यामुळे ही ताकद एकवटून राज्यात पुन्हा सरकार आणण्यासाठी सर्व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रात युतीची ताकद मोठी असल्याने; महायुतीलाच जनतेचा कौल मिळेल. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्र आणि पुण्याचे महत्त्वाची भूमिका असेल, असा विश्वास ही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### आमची चुक काय

मराठा आरक्षणावर बोलताना नामदार पाटील म्हणाले की, राज्यातील मराठा समाजाला माननीय देवेंद्र फडणवीस आणि एकनाथजी शिंदे यांच्या काळात आरक्षण मिळालं. उद्धव ठाकरे सरकारच्या काळात मराठा समाजाला मिळालेलं आरक्षण गेलं. त्यामुळे मनोज जरांगे यांनी आमची चुक काय झाली ते तरी सांगावं, असे आवाहन करुन मराठा समाज याचा सकारात्मक विचार करेल, असा विश्वास व्यक्त केला.

# भोसरी विधानसभा निवडणूक:

# चऱ्होली गाव आ. लांडगेंसाठी ‘लकी’!

## सर्वपक्षीय ग्रामस्थांसह समर्थकांची लांडगेंसाठी विजयी वज्रमूठ

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभेतील आमदार महेश लांडगे यांनी चऱ्होलीचे ग्रामदैवत श्री वाघेश्वर महाराज मंदिरात प्रचाराचा नारळ फोडाला. विशेष म्हणजे, २०१९ मध्ये चऱ्होलीत प्रचार करतानाच लांडगे यांच्या विधानसभा निवडणूक उमदेवारीची घोषणा झाली होती. २०२४ मध्येसुद्धा योगायोगाने चऱ्होलीतील ग्रामस्थांच्या बैठकीत असतानाच भाजपा महायुतीचा उमेदवार म्हणून लांडगे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले.**



२०१९ मध्ये पहिल्यांदा भाजपाच्या तिकीटावर लढणारे महेश लांडगे यांनी विजय मिळवला होता. आता त्याच चऱ्होलीमधून मताधिक्य मिळेल आणि २०२४ मध्येसुद्धा आमदार लांडगे विजयी होतील, असा निर्धार चऱ्होलीकरांनी केला. त्यामुळे भोसरी विधानसभा मतदार संघातील वातावरण फिरले आहे. किंबहुना, चऱ्होली आमदार लांडगे यांच्यासाठी राजकीयदृष्ट्या ‘लकी’ आहे, अशी चर्चा पंचक्रोशीत आहे.

२०१७ मध्ये भाजपाच्या सत्ताकाळात भाजपाचे पहिले व समाविष्ट गावांतील पहिले महापौरपद नितीन काळजे यांच्या रुपाने देण्यात आले. त्यामुळे चऱ्होलीसह परिसरात आतापर्यंतचे सर्वाधिक बजेट चऱ्होलीवर खर्च करण्यात आले. तळागाळात विकासाची गंगा आली. १० वर्षांत चऱ्होली गावचे रुपडे पालटले. त्यामुळे ग्रामस्थ आणि चऱ्होलीकरांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

महायुतीची उमेदवारी घोषित झाल्यानंतर चऱ्होलीतील ग्रामस्थांनी आनंद साजरा केला. चऱ्होलीतील सामाजिक कार्यकर्ते व भाजपाचे पदाधिकारी सचिन तापकीर यांनी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने प्रभावीपणे संघटन केले आहे. त्यांनी स्थानिक नागरिक, ग्रामस्थ आणि सोसायटीधारकांचा विश्वास संपादन करीत आमदार लांडगे यांच्या पाठिशी यंत्रणा उभी केली आहे.

### चऱ्होलीत मताधिक्य निश्चित...

सोसायटीधारकांच्या विविध समस्या सोडवण्यासह चऱ्होलीतील विकास आराखड्यानुसार मंजूर रस्ते, ड्रेनेजलाईन, वीज समस्या यासह पाणी पुरवठ्याच्या समस्या सोडवण्यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून सचिन तापकीर यांनी सातत्याने पुढाकार घेतला. त्यामुळे या भागात आमदार लांडगे यांच्या पाठिशी सर्वसामान्य नागरिकांची मोठी ताकद उभा राहणार आहे. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसच्या विरोधात सचिन तापकीर यांनी मोठ्या ताकदीने आव्हान निर्माण केले. त्यामुळे चऱ्होलीतून २०२४ च्या निवडणुकीत आमदार लांडगे मताधिक्य घेतील, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

---

# नवी सांगवी परिसरात शंकर जगताप यांचा भेटीगाठी आणि बैठकांचा धडाका

## मिशन विधानसभा: औक्षण आणि फुलांचा वर्षाव करत नागरिकांकडून जगताप यांचे जंगी स्वागत

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांनी उमेदवारी जाहीर होताच नवी सांगवी परिसरात नागरिकांच्या गाठीभेटी आणि बैठका घेऊन नागरिकांशी संवाद साधला. यावेळी जगताप यांनी ‘डोअर टू डोअर’ जाऊन नागरिकांचा आशीर्वाद घेतला.**



यावेळी माजी नगरसेवक राजेंद्र राजापूरे, माजी नगरसेवक अंबरनाथ कांबळे, माजी नगरसेवक शैलेश मोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष बाळासाहेब पिल्लेवार, सूर्यकांत गोफणे, आप्पा पाटील, सखाराम रेडेकर, राजेंद्र पाटील, नारायण भुरे, देविदास शेलार, गिरीश देवकाते, भास्कर गाडेकर, अविनाश भुरे , अभिमन्यू गाडेकर, संदीप दरेकर, संजय मराठे, ह.भ.प. वाघ महाराज, ललित म्हसेकर, भूषण थोरवे, राजू नागणे, गणेश बनकर, राहुल शिंदे, अमित घोडसाळ, प्रवीण पाटील, सुरेश शिंदे, सचिन खराडे, अशोक कवडे, दुधभाते, शुभम फरांदे, किशोर शिंदे, रोहन दुर्गे, अविनाश जाधव, प्रवीण जगताप, राजेश पवार, जयसिंग जाधव, राजू मोरे, विक्रम भेगडे, अरविंद नाळे, दिनकर मोहिते, शामराव धस, आशिष कवडे, हनुमंत डुंबरे, सुनील भिसे, अनिल शिर्के, साईश कवाडे, यांच्यासह महायुतीचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह परिसरातील नागरिक व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी शंकर जगताप यांनी नवी सांगवीतील फेमस चौक, स्वामी विवेकानंद सोसायटी, स्वामी विवेकानंद नगर, सनशाइन रेसिडेन्सी, राजाराम नगर, भारत बेकरी रोड, ढोरे पाटील फार्म, सीएमई कॉलनी, संत तुकाराम नगर, समता नगर, गणेश नगर लेन १ ते ३, किर्ती नगर लेन १ ते ३, समर्थ नगर लेन १ ते २, समर्थ नगर ३, समर्थ नगर ४, चैत्रबन सोसायटी, आदर्श नगर, आदर्श नगर लेन १ ते ४, सरस्वती पार्क, सिद्धी पार्क, कृष्णाई रेसिडेन्सी, इंद्रप्रस्थ पार्क, शिवम पार्क, शिवाजी पार्क १ व २, पुष्पा पार्क, कृष्णानगर लेन १ ते ३, साईराज रेसिडेन्सी, सह्याद्री कॉलनी, विद्यानगर लेन १ ते ३, ज्ञानेश पार्क लेन १ ते ४, काटेपुरम सोसायटी, नंदनवन कॉलनी, गुरुदत्त कॉलनी, साईनाथ कॉलनी, विनायक नगर लेन १ ते ३, सुयोग कॉलनी, त्रिमूर्ती कॉलनी, कवडे नगर लेन १ ते ४, मयूर नगरी फेज १ व फेज २, रामनगर लेन १ ते ५, भक्तिदर्शन, चंद्ररंग पॅराडाईज, ओरियाना सोसायटी, गजानन नगर लेन १ ते ३, नेताजी नगर, गांगर्डे नगर, महाराष्ट्र नगर, व्हीएस रेसिडेन्सी, चंद्ररंग सॅटीन स्काय, काशीद नगर, आनंद पार्क, स्वप्न पार्क, टेन इलाईट सोसायटी, सहकारनगर, राजीव गांधी नगर लेन १ ते १० हा संपूर्ण परिसर पिंजून काढला. याप्रसंगी जगताप यांनी नवी सांगवी प्रभागातील सर्वपक्षीय माजी नगरसेवक, प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह व्यापारी, ज्येष्ठ नागरिक, सार्वजनिक मंडळांचे कार्यकर्ते, महिला मंडळांच्या सदस्य यांच्या गाठीभेटी घेत संवाद साधला. त्याचबरोबर सर्व धार्मिक स्थळांनाही भेट देत तेथील प्रमुखांशीही चर्चा केली. विशेषतः या परिसरातील सर्व सोसायटींना भेट देऊन संबंधित सोसायटीचे चेअरमन, कार्यकारिणी सदस्य आणि रहिवाश्यांशी बैठक घेऊन त्यांच्याशीही जगताप यांनी संवाद साधला.

### ‘अब की बार, शंकरभाऊ आमदार’

दरम्यान, ठिकठिकाणी नागरिकांच्या वतीने जगताप यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. महिला भगिनींनी औक्षण करून तर नागरिकांनी फुलांची उधळण करत त्यांचे जंगी स्वागत केले. यावेळी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे ‘अब की बार, शंकरभाऊ आमदार’ अशा घोषणा देत आम्ही सर्वजण तुमच्या सोबत आहोत असा विश्वास, यावेळी जगताप यांना दिला.




# पन्नू, निज्जरविषयी खुलासे करावेतच

**कॅनडात खलिस्तानवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येवरून त्या देशाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी भारताला बदनाम करून अडचणीत आणण्याचे हरतऱ्हेने प्रयत्न केले, पण त्यांना यश आले नाही.**

'कॅनडाच्या भूमीवर कॅनेडियन नागरिकाची हत्या' या वरकरणी न्याय्य वाटणाऱ्या तक्रारीलाही त्यांना कोणत्याही स्वरूपाचे कायदेशीर वा नैतिक अधिष्ठान देता आले नाही. याचे कारण कॅनेडियन सरकार वा तपासयंत्रणांनी आरोपाच्या पुष्ट्यर्थ कोणतेही ठोस पुरावे सादर केले नाहीत. शीख विभाजनवाद्यांच्या समर्थनामागे असलेले ट्रुडो यांचे मतपेढीचे राजकारण लपून राहिले नाही. त्यामुळे जितका संशय कॅनेडियन मंडळींनी भारताविषयी व्यक्त केला, तितकाच तो कॅनडाच्या हेतूंविषयी निर्माण झाला. सबब, आज दोन्ही देशांतील राजनैतिक संबंध गोठलेल्या अवस्थेत आहेत. कटुता टोकाला गेलेली आहे. या परिप्रेक्ष्यात अमेरिकेमध्ये अशाच एका खलिस्तानवाद्याच्या हत्येचा प्रयत्न आणि त्यात भारतीयांच्या कथित सहभागावरून निर्माण झालेल्या वादाकडे पाहावे लागेल. हरपतवंतसिंग पन्नू हादेखील निज्जरप्रमाणेच उच्चकोटीतला भारतद्वेष्टा.भारतातून पळून गेलेल्या अनेक खलिस्तानी मानसिकतेच्या शिखाप्रमाणेच हादेखील कॅनडा, अमेरिका अशा 'उदारमतवादी'



देशांच्या राजाश्रयाचा लाभार्थी. त्याच्या हत्येचा प्रयत्न झाला, त्याविषयी अमेरिकेतील तपासयंत्रणा सावध झाली. त्यांनी तपास सुरू केला आणि तपासाची पाळेमुळे भारतापर्यंत पोहोचली तेव्हा या यंत्रणेने अमेरिकेच्या सरकारला लक्ष घालण्यास सांगितले. ज्यो बायडेन प्रशासनाने त्यानुसार कार्यवाही सुरू केली. दरम्यानच्या काळात अमेरिकेच्या न्याय विभागाने रीतसर खटला चालवण्यासाठी कागदपत्रेही तेथील एका न्यायालयात दाखल केली. हे करताना निव्वळ भारत सरकारशी पडद्यामागे संवाद राहील याची दक्षता घेतली. अध्यक्ष बायडेन किंवा त्यांच्या प्रशासनातील कोणाही जबाबदार व्यक्तीने जाहीररीत्या या तपासाचा उल्लेख केला नाही. त्याऐवजी प्रथम इंग्लंडमधील 'फायनॅन्शियल टाइम्स' आणि नंतर अमेरिकेतील 'वॉशिंग्टन पोस्ट' या पत्रांनी वाच्यता केली. अमेरिकेने वाच्यतेच्या भानगडीत न पडता प्रक्रियेला सुरुवात केली. कॅनडाने याच्या बरोबर उलट केले आणि टीका ओढवून घेतली. हा दोन व्यवस्थांमधील फरक. कदाचित अमेरिकेने सध्याची त्यांची भारतमैत्री पाहता, आडूनच भारताला याविषयी अवगत करण्याचे राजकीय धोरण अवलंबले असेल. याउलट राजकीय गरजेपोटीच ट्रुडोंनी आदळआपट सुरू केली हे स्पष्ट आहे. आता मुद्दा आपण काय करणार हा आहे.कारण 'पुरावे द्यावेत' असे आपण अमेरिकेला सुनावू शकत नाही. प्रथम निखिल गुप्ता आणि आता विकास यादव अशी नावेच अमेरिकेच्या तपासात उघड झाली आहेत. यातील विकास यादवचे नाव नुकतेच जाहीर झाले. तर गेल्या वर्षी निखिल गुप्ता याचे नाव जाहीर झाल्यानंतर त्याला चेक प्रजासत्ताकात अटक झाली. काही महिन्यांपूर्वी त्याचे अमेरिकेत प्रत्यार्पण झाले. यांतील विकास यादव हे नाव भारताच्या दृष्टीने अधिक अडचणीचे. कारण तो माजी भारतीय गुप्तचर असल्याचे अमेरिकेत दाखल झालेल्या आरोपपत्रात नमूद आहे. विकास हा 'रॉ' या भारतीय गुप्तचर संस्थेचा कर्मचारी होता, की हस्तक याविषयी स्पष्टता नाही. पण तो केंद्रीय राखीव पोलीस दलात सहायक समादेशक (असिस्टंट कमांडंट) होता आणि त्याची त्या गणवेशातील छायाचित्रेही समाजमाध्यमांवर प्रसृत झालेली आहेत. त्यामुळे 'आता तो भारत सरकारसाठी काम करत नाही' हा आपला बचाव काहीसा लंगडा ठरतो. हा तपास आणखी पुढे सरकू लागला आणि आपण त्यानंतर खुलासे करत राहिलो, तर धावपळ आणि नामुष्कीशिवाय फार काही हाती लागणार नाही. आपण कॅनडाला डोळे वटारू शकतो, अमेरिकेबाबत ते संभवत नाही. या संदर्भात पन्नू किती खुनशी आहे किंवा निज्जर कसा माथेफिरू होता या दाव्यांना फारसा अर्थ नाही. निज्जर आणि पन्नू प्रकरणे समांतर प्रकाशात आली आहेत. दोन्हींमागे समान दुवा भारत आहे. त्यामुळे भारत सरकारने भावनांचा आधार न घेता, अमेरिकेशी संवाद साधून खरोखरच काय घडले.

## प्रासंगिक »

### अडगेची राहू...

***भूमिका न घेणे किंवा पुढील लाभ नजरेसमोर ठेवून चुकीच्या निर्णयांची री ओढणे हा शिक्षण क्षेत्राला जडलेला गंभीर आजार...***

गेले तीन दिवस 'लोकसत्ता'ने अभ्यासक्रम बदलाच्या प्रस्तावाबाबत विस्तृत वृत्तांत प्रसृत केले. निवडणुकीच्या साठमारीत मग्न असलेल्या राज्यातील राजकीय पक्षांस त्यावर भाष्य करण्यास वेळ नाही. तथापि हा विषय राजकारण्यांवर सोडून 'हलक्यात घ्यावा' (हे नवे 'हिंदा'ळलेले मराठी) असा नसल्याने त्यावर भाष्य आवश्यक ठरते.याचे कारण नवा, आदर्श, संस्कारक्षम अभ्यासक्रम राज्यभर लागू करण्याचे श्रेय घेण्याच्या नादात आचारसंहितेच्या आदल्या दिवशी नव्या अभ्यासक्रम आराखड्याचा अंतिम मसुदा जाहीर करण्यात आला. सरकारच्या लेखी महामंडळांवर कोणाची तरी वर्णी लावणे आणि पुढची पिढी घडवेल/बिघडवेल असा अभ्यासक्रम या दोन्हींचे मोल एकच! हा नवा मसुदा पाहिल्यास सक्षम मनुष्यबळाच्या रूपाने या देशाची 'नालंदा'पासूनची शैक्षणिक परंपरा पुढे जाण्याऐवजी शिक्षण विभागाने मुखभंगाची परंपरा राखल्याचा विश्वास नक्की मिळतो..

लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपचे हात आकाशाला पोहोचले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नेतृत्व एकहाती चारशे जागा जिंकून देईल असा (अति) आत्मविश्वास भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याला होता. भाजपच्या नेतृत्वालाही तसेच वाटत असावे. त्यांनी मोठ-मोठ्या घोषणा केल्या, गॅरंटी दिली.

## संघ हा निवडणुकीतील 'एक्स फॅक्टर'?

लोक आपल्यालाच मते देणार ही बाब त्यांनी गृहीत धरली. लोकांना हे गृहीत धरणे आवडले नसावे, त्यांनी भाजपच्या नेतृत्वाच्या पारड्यात एकगठ्ठा मते न देऊन दणका दिला. लोकसभा निवडणुकीत गर्वाचे घर खाली झाल्यानंतर भाजपला एकदम आपल्या मूळ संघटनेची म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची आठवण झाली असावी. लोकसभेच्या निवडणुकीत आम्हाला संघाची गरज नाही, असे म्हणणारा भाजप हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये पूर्णपणे संघाच्या मदतीवर अवलंबून होता असे निकालावरून स्पष्ट होते.लोकसभा निवडणुकीत भाजपने आमची मदत मागितलीच नाही तर आम्ही ती कशी पुरवणार, असे संघाचे म्हणणे होते. त्यामुळे त्या वेळी उत्तर प्रदेश, महाराष्ट्र अशा भाजपसाठी अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या राज्यांमध्ये संघाचे कार्यकर्ते भाजपच्या प्रचारासाठी उतरले नाहीत. संघानेही अप्रत्यक्षपणे भाजपच्या नेतृत्वाला संघाची 'ताकद' दाखवून



दिली. हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपच्या नेतृत्वाला आपली ही चूक कळली असावी आणि कदाचित संघाबरोबर तडजोडीची भूमिका घेतली असावी. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत निष्क्रिय असलेला संघ हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीत कमालीचा सक्रिय झालेला होता. संघातील सहकार्यवाह हरियाणाची जबाबदारी सांभाळत होते. जाटेतरांच्या ध्रुवीकरणाचे कळीचे काम संघाच्या कार्यकर्त्यांनी केल्याचे बोलले जाते. हरियाणामध्ये विजय मिळेल असे खुद्द भाजपच्या नेत्यांनाही वाटत नव्हते. संघातील कार्यकर्ते मात्र खासगीमध्ये भाजप विजयी होऊ शकतो असा विश्वास व्यक्त करत होते. हरियाणात संघाने भाजपला विजय मिळवून देण्यासाठी कष्ट घेतले असतील तर तो आपल्या मूळ राज्यात म्हणजे महाराष्ट्रात ते का घेणार नाही? त्यामुळे महाराष्ट्रात संघ हा महायुतीसाठी 'एक्स फॅक्टर' ठरण्याची शक्यता आहे.भाजप आणि संघ निष्ठावानांच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या वेळची परिस्थिती आता राहिलेली नाही. राज्यात संघ पूर्णपणे सक्रिय झालेला आहे. भाजपच्या निवडणुकीच्या निर्णयप्रक्रियेमध्ये संघाच्या सहकार्यवाहांच्या मतांना अधिक महत्त्व दिले जाऊ लागले आहे. संघाच्या नेहमीच्या पद्धतीनुसार मतदारसंघनिहाय संघाच्या प्रतिनिधींकडे जबाबदारी देण्यात आली आहे. सहकार्यवाह राज्याचा दौरा करत आहेत. राज्याच्या विधानसभा निवडणुकीत संघ प्रत्यक्ष कामाला लागला हा एक भाग झाला! भाजपच्या अंतर्गत निर्णयप्रक्रियेमध्ये संघ आता देवेंद्र फडणवीस यांच्या पूर्णपणे पाठीशी उभे राहिला असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# स्वाभिमानाशी तडजोड नाही!

## भाजपसोबत युती म्हणजे अफजल खानाशी हातमिळवणी : राऊत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शिवसेना महाराष्ट्राच्या स्वाभिमानाशी तडजोड करणार नाही. महाराष्ट्राचा स्वाभिमान पायदळी तुडवणारांशी आम्ही हात मिळवणी करणार नाही. भाजपशी हात मिळवणी करणे म्हणजे औरंगजेब आणि अफजल खानाशी हात मिळवणी करणे, असे परखड मत शिवसेनेचे नेते संजय राउत यांनी व्यक्त केले आहे.**

संजय राऊतांची अमित शाहांशी भेट झाली हे सांगितलं जात, ही हास्यास्पद गोष्ट आहे. काँग्रेस नेते असे दावे करत असतील तर त्यांचंही आश्चर्य वाटत आहे. शिवसेनेने फक्त संघर्ष केलेला नाही, तर आमच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आलं होतं. आमचा पक्ष फोडला, आमचं सरकार पाडलं. आमचं चिन्ह त्यांनी चोरलं. त्याही पेक्षा हा महाराष्ट्र त्यांनी गद्दारांच्या हातात दिला. या वेदना घेऊन आम्ही संघर्ष केला. कोणी आमच्यावर कोणी शंका घेत असतील, तर ते एका बापाची औलाद नाहीत. त्यांनी त्यांचा बाप दाखवावा अन्यथा श्राद्ध घालावं, असं ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत म्हणाले. ते मुंबईत पत्रकारांशी बोलत होते.

संजय राऊत म्हणाले, स्वत:च्या स्वार्थासाठी आमच्या स्वाभिमानावर शिंतोडे उडवणारे हे लोक आहेत. अशा अफवा पसरवून कोणी लढणार असेल तर त्यांना महाराष्ट्रात राजकारण करण्याचा अधिकार नाही. कोणी सुपाऱ्या दिल्या याची बातमी आमच्याकडे आली आहे. आमचीही यंत्रणा आहे. एक वेगळं पेगासेस आमच्याकडे सुद्धा आहे. कोण कोणाकडून अफवा पसरवून घेतय, हे आमच्याकडे आहेत. शिवसेना महाराष्ट्राच्या स्वाभिमानाशी तडजोड करणार नाही. महाराष्ट्राचा स्वाभिमान पायदळी तुडवणारांशी आम्ही हात मिळवणी करणार नाही. भाजपशी हात मिळवणी करणे म्हणजे औरंगजेब आणि अफजल खानाशी हात मिळवणी करणे. पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, जागा वाटपाचा विषय पूर्णपणे वेगळा आहे. अफवा पसरवल्या



जातात, हा विषय वेगळा आहे. आमचं मन साफ आहे. आमचा विचार स्वच्छ आहे. आम्हाला जे करायचंय ते आम्ही छाती ठोकपणे करु. आमच्या 210 जागा संपूर्ण चर्चेअंती मोकळ्या झालेल्या आहेत. आमची भूमिका आहे, महाराष्ट्रात आम्ही एकत्र राहायला पाहिजेत. महाराष्ट्रावर चालून येणाऱ्या लोकांचा पराभव आम्ही करणार आहोत. आमची लढाई महाराष्ट्राच्या शत्रूंविरोधात सुरु आहे. महाराष्ट्राला लुटणाऱ्यांविरोधात आम्ही लढत आहोत. शिवसेना अशा शक्तींविरोधात कधीही झुकणार नाही. ज्यांना देशाचं संविधान संपवायचं आहे. जे लोक महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचवतात, त्यांच्याविरोधात आमचा लढा आहे, असंही संजय राऊत यांनी सांगितलं.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही बातमी आल्यानंतर प्रचंड चर्चा झाली कारण २०१९ मध्ये जी युती मुख्यमंत्रिपद वाटून घेण्यामुळे तुटली त्यानंतर महाराष्ट्राचं राजकारणच बदललं. अजूनही महाविकास आघाडीचं जागावाटपाचं घोडं गंगेन न्हालेलं नाही.विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्राकडे एक महिनाही उरलेला नाही. अशातच सूत्रांच्या हवाल्याने एक बातमी समोर आली जी काँग्रेसकडूनच आल्याचं सांगण्यात आलं. ही बातमी अशी होती की उद्धव ठाकरे आणि देवेंद्र

### काय म्हणाले संजय राऊत?

विशेष बाब म्हणजे ही बातमी काँग्रेसच्या सूत्रांनी दिल्याचंही समोर आलं होतं. याबाबत आता संजय राउत यांनी स्पष्टीकरण दिलं आहे."संजय राऊतांची अमित शाह यांच्याशी भेट झाली हे सांगितलं जातंय, ही हास्यास्पद गोष्ट आहे. काँग्रेस नेते असे दावे करत असतील तर त्यांचंही आश्चर्य वाटतं आहे. शिवसेनेने फक्त संघर्ष केलेला नाही, तर आमच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आलं होतं. आमचा पक्ष फोडला, आमचं सरकार पाडलं. आमचं चिन्ह त्यांनी चोरलं. त्याही पेक्षा हा महाराष्ट्र त्यांनी गद्दारांच्या हातात दिला. या वेदना घेऊन आम्ही संघर्ष केला. कोणी आमच्यावर कोणी शंका घेत असतील, तर ते एका बापाची औलाद नाहीत.

फडणवीस यांची भेट झाली आहे तसंच संजय राउत यांनी अमित शाह यांना फोन केला, काँग्रेस हायकमांडशी महाराष्ट्रातल्या काँग्रेस नेत्यांनी ही चर्चा केली अशी माहिती समोर आली. एवढंच नाही तर वाऱ्यासारखी व्हायरलही झाली. महाविकास आघाडीमध्ये ऑल इज नॉट वेल पासून उद्धव ठाकरे महायुतीत येणार का? इथपर्यंतच्या चर्चा झाल्या. याबाबत आता संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे.विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही बातमी आल्यानंतर प्रचंड चर्चा झाली कारण २०१९ मध्ये जी युती मुख्यमंत्रिपद वाटून घेण्यामुळे तुटली त्यानंतर महाराष्ट्राचं राजकारणच बदललं. अजूनही महाविकास आघाडीचं जागावाटपाचं घोडं गंगेन न्हालेलं नाही. काँग्रेस नेत्यांकडून शिवसेना यांना हव्या त्या जागा मिळत नाहीत अशी चर्चा आहे. तसंच जागावाटपावरुन नाना पटोलेंची भूमिकाही अनेकांना मान्य नाही. त्यामुळे शिवसेना आणि काँग्रेस यांच्यातून विस्तव जात नाही अशा चर्चाही रंगल्या होत्या. त्यामुळे उद्धव ठाकरेयांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याची आणि संजय राऊतांनी अमित शाह यांना फोन केल्याची चर्चा रंगली.

# भाजपच्या पहिल्या यादीत गुहागरचा समावेश नाही

## शिवसेना की भाजपा जागा लढणार याचा सस्पेंस कायम

। अमरावती ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यामध्ये गुहागार विधानसभेच्या उमेदवाराचा समावेश नाही. त्यामुळे या जागेचा सस्पेन्स अजूनही वाढला आहे. ही जागा शिवसेना लढवणार की पुन्हा भाजपच्या वाट्याला येणार हे अजूनही स्पष्ट झालेले नाही.**

शिवसेना-भाजप युतीच्या जागा वाटपात गुहागर विधानसभा मतदारसंघाची जागा शिवसेनेकडे आहे. शिवसेना शिंदे गटाने ही



जागा लढविण्याची घोषणा केली आहे. पक्षाच्या नेत्याकडून उमेदवाराचे नावही घोषित करण्यात आले आहे. त्यानंतर शिवसेनेच्या उमेदवाराने मतदारसंघात भेटीगाठी सुरू केल्या आहेत. त्याचबरोबर भाजपनेही या मतदारसंघात निवडणुकीची तयारी सुरू केली आहे, मागील वर्षापासून भाजप गुहागरची जागा लढवण्याच्या तयारीत आहे. परंतु प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचा बलाढ्य उमेदवार असल्यामुळे येथे कोणाला उमेदवारी द्यायची

### शिवसेनेच्या यादीकडे सर्वांचे लक्ष

मात्र भाजप स्थानिक कार्यकर्त्यांना गुहागरची जागा आपल्यालाच मिळेल अशी आशा आहे ते निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारांची अद्याप घोषणा झालेली नाही. त्यामुळे गुहागरची उमेदवारी शिवसेनेच्या कोणत्या उमेदवाराला मिळेल हे अद्याप निश्चित नाही. भाजपच्या पहिल्या यादीत गुहागरचा समावेश नाही. त्यामुळे आता भाजपच्या दुसऱ्या यादीत आणि शिंदे गटाच्या शिवसेनेच्या पहिल्या यादीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. गुहागरची जागा भारतीय जनता पार्टीला मिळावी अशी स्थानिक कार्यकर्त्यांची मागणी आहे, त्यांनी वरिष्ठांपर्यंत ती पोहोचवली आहे

यावरून शिवसेना भाजप यांच्यामध्ये रस्सीखेच सुरू आहे. निवडणुकीचा कालावधी सुरू झाल्यानंतर नवीन नवीन चर्चा समोर येत आहेत. लोकसभा निवडणुकीत भाजपने रत्नागिरी शिवसेनेला देण्याचे भाजपकडून मान्य करण्यात आले होते. त्यानुसार रत्नागिरी जिल्ह्यातील पाचपैकी चार जागा शिवसेनेच्या वाट्याला भाजपने सोडल्याचे सांगितले जात आहे.

# गडचिरोलीत पाच नक्षल्यांना कंठस्नान!

## पोलिसांनी नक्षल्यांचा घातपाताचा मोठा कट उधळला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नक्षल्यांचा घातपाताचा डाव उधळून लावण्यात गडचिरोली पोलिसांना २१ ऑक्टोबरला यश आले. छत्तीसगड सीमेवरील कोपर्शी जंगलात नक्षलवादी व जवानांत झालेल्या जोरदार चकमकीत पाच नक्षल्यांना पोलिसांनी कंठस्नान घातले. चकमकीत एक जवान जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत.**



### मोठा फौजफाटा तैनात

या घटनेनंतर पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी अपर अधीक्षक यतीश देशमुख , एम .रमेश यांच्या नेतृत्वात सी -६० पथकाच्या २२ तुकड्या व सीआरपीएफ च्या शीघ्रकृती दलाच्या दोन तुकड्या या कोपर्शी जंगलात पाठविण्यात आल्या. जंगलात दोन वेगवेगळ्या ठिकाणी माओवाद विरोधी अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.छत्तीसगड सीमेवरील भामरागड तालुक्यातील कोपर्शी जंगलात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये २१ ऑक्टोबरला पहाटे चकमक सुरु झाली. नक्षलविरोधी अभियान राबवित असताना नक्षलवाद्यांनी जवानांच्या दिशेने गोळीबार केला. यावेळी जवानांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. यात पाच नक्षल्यांचा खात्मा करण्यात जवानांना यश आले.

छत्तीसगड सीमेवरील भामरागड तालुक्यातील कोपर्शी जंगलात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये २१ ऑक्टोबरला पहाटे चकमक सुरु झाली. नक्षलविरोधी अभियान राबवित असताना नक्षलवाद्यांनी जवानांच्या दिशेने गोळीबार केला. यावेळी जवानांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. यात पाच नक्षल्यांचा खात्मा करण्यात जवानांना यश आले. दोन वेगवेगळ्या ठिकाणी ही चकमक झाली. यावेळी एक जवानही जखमी झाला आहे. जखमी जवानाला हेलिकॉप्टरने गडचिरोलीत आणले. त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, मृत पाच नक्षलवाद्यांचे मृतदेह देखील गडचिरोली येथे आणले आहेत. त्यांची ओळख पटविण्याचे काम उशिरापर्यंत सुरु होते. गडचिरोली पोलिसांनी नक्षलवादविरोधी अभियान प्रभावीपणे राबविल्यामुळे नक्षल्यांना जबर हादरा बसला आहे. अनेक जहाल नक्षलवादी चकमकीत ठार झाले तर काहींनी शरणागती पत्करली. त्यामुळे माओवादी चळवळ खिळखिळी झाली आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नक्षलवादी घातपात करु शकतात, ही शक्यता गृहित धरुन पोलीस सतर्क आहेत. नक्षलवाद्यांविरुध्द महाराष्ट्रासह छत्तीसगड पोलिसांनीही आक्रमकपणे मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नक्षली सैरभैर झाले आहेत.

संघटनेचे नेतृत्व करणाऱ्या काहींना अटक झाली तर काही चकमकीत ठार झाले. त्यामुळे ही चळवळ आता नेतृत्वहीन होत आहे. या पार्श्वभूमीवर छत्तीसगडमधील नक्षली सीमावर्ती भागातील घनदाट जंगलाचा आश्रय घेऊन गडचिरोलीत घुसखोरी करत असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. कोपर्शी जंगलात पहाटे सहा वाजेपासून जवान व नक्षल्यांत चकमक सुरु झाली. दुपारी ४ वाजेपर्यंत ही चकमक सुरुच होती. त्यानंतर पोलिसांनी शोधमोहीम सुरु केली आहे. परिसरात झडती घेतल्यानंतर आतापर्यंत पाच नक्षल्यांचे मृतदेह आढळून आले आहेत. यात मृत नक्षल्यांची संख्या वाढू शकते, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.गडचिरोली येथे आणले आहेत. त्यांची ओळख पटविण्याचे काम उशिरापर्यंत सुरु होते. गडचिरोली पोलिसांनी नक्षलवादविरोधी अभियान प्रभावीपणे राबविल्यामुळे नक्षल्यांना जबर हादरा बसला आहे. अनेक जहाल नक्षलवादी चकमकीत ठार झाले तर काहींनी शरणागती पत्करली. त्यामुळे माओवादी चळवळ खिळखिळी झाली आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नक्षलवादी घातपात करु शकतात, ही शक्यता गृहित धरुन पोलीस सतर्क आहेत. नक्षलवाद्यांविरुध्द महाराष्ट्रासह छत्तीसगड पोलिसांनीही आक्रमकपणे मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नक्षली सैरभैर झाले आहेत. संघटनेचे नेतृत्व करणाऱ्या काहींना अटक झाली तर काही चकमकीत ठार झाले. त्यामुळे ही चळवळ आता नेतृत्वहीन होत आहे. या पार्श्वभूमीवर छत्तीसगडमधील नक्षली सीमावर्ती भागातील घनदाट जंगलाचा आश्रय घेऊन गडचिरोलीत घुसखोरी करत असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. कोपर्शी जंगलात पहाटे सहा वाजेपासून जवान व नक्षल्यांत चकमक सुरु झाली. दुपारी ४ वाजेपर्यंत ही चकमक सुरुच होती. त्यानंतर पोलिसांनी शोधमोहीम सुरु केली आहे. परिसरात झडती घेतल्यानंतर आतापर्यंत पाच नक्षल्यांचे मृतदेह आढळून आले आहेत.

# लॉरेन्स बिश्नोईची केवळ तुरुंगातच चौकशी

## इतरत्र नेण्याची परवानगी नाही, बिश्नोईला 'विशेष' वागणूक का?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कुख्यात गुंड लॉरेन्स बिश्नोई आणि त्याची टोळी सध्या सर्वत्र चर्चेत आहे. या टोळीने मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) नेते बाबा सिद्दिकी यांची हत्या केली आहे. तसेच बॉलिवूड अभिनेता सलमान खानला जीवे मारण्याची धमकी दिली आहे. लॉरेन्सला सीमेवर अंमली पदार्थांची तस्करी करताना पोलिसांनी पकडलं होतं. तो सध्या गुजरातमधील साबरमती तुरुंगात कैद आहे.**



### असे आदेश कधी देता येतात?


कैद्याला तुरुंगातून बाहेर काढण्याची परवानगी दिली गेली तर सार्वजनिक व्यवस्थेत गडबड होऊ शकते, कायदा व सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तपास यंत्रणांचं म्हणणं आहे की तुरुंगातील एखाद्या व्यक्तीची चौकशी मर्यादित असते. कारण त्याला केवळ एक किंवा दोन अधिकारी काही तास किंवा विशिष्ट कालावधीसाठी भेटून त्याची चौकशी करू शकतात. इतर आरोपींना चौकशीदरम्यान समाविष्ट करता येत नाही.सुरक्षेच्या कारणास्तव सरकारकडून असे आदेश दिले जातात.

मुंबईतील अनेक गुन्ह्यांमध्ये लॉरेन्स बिश्नोईचा सहभाग असल्यामुळे मुंबई पोलिसांनी अनेकवेळा त्याची कोठडी मागितली आहे. मात्र, त्यांना न्यायालयाकडून लॉरेन्स बिश्नोईची कोठडी मिळाली नाही.साधारणपणे कुठल्याही खटल्यातील आरोपीला त्याच्याविरोधातील कारवाईदरम्यान न्यायालयात हजर केलं जातं. परंतु, बिश्नोईची चौकशी करू च्छिणारी कोणतीही तपास यंत्रणा त्याला केवळ तुरुंगाच्या आवारातच भेटू शकते. त्याची केवळ तुरुंगातच चौकशी केली जाऊ शकते. त्याला साबरमती तुरुंगातून इतरत्र कुठेही हलवण्याची परवानगी नाही.मुंबई पोलिसांनी लॉरेन्स बिश्नोईच्या कोठडीची अनेकदा मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी अनेकदा न्यायालयात याचिका दाखल केली होती. परंतु, आतापर्यंत एकदाही मुंबई पोलिसांना त्याची कोठडी मिळाली नाही. मुंबई पोलिसांना बिश्नोईची कोठडी मिळवण्याच्या मार्गात गृहमंत्रालयाच्या सीआरपीसीच्या कलम २६८ अंतर्गत जारी केलेला एक आदेश मोठा अडथळा बनला आहे. त्यामुळे बिश्नोईला साबरमती तुरुंगातून कुठेही नेता येत नाही. गृहमंत्रालयाचा हा आदेश सुरुवातीला ऑगस्ट २०२४ पर्यंत लागू (प्रभावात) होता. मात्र, अलीकडेच या आदेशाची मर्यादा वाढवण्यात आली आहे. गृहमंत्रालयाने भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या (बीएनएसएस) कलम ३०३ अंतर्गत या आदेशाची मर्यादा एक वर्षाने वाढवली आहे. सीआरपीसीच्या कलम २६८ ने राज्य सरकारांना विशिष्ट कैद्यांना कलम २६७ च्या नियमांमधून वगळण्याचा अधिकार दिला आहे. तसेच बीएएसएसच्या कलम ३०३ अंतर्गत केंद्र सरकार एनआयएने चालवलेल्या खटल्यांमधील आरोपींसह काही मोठ्या गुन्ह्यांधील कैद्यांना एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात हलवू नये असा आदेश देऊ शकतं.

# नोरा फतेहीने मुंबईतील सुरुवातीचा संघर्ष काळ सांगितला

कुणाल खेमू दिग्दर्शित 'मडगांव एक्सप्रेस' हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करताना दिसत आहे. या चित्रपटाचं कौतुक देखील होत आहे. या चित्रपटात दिव्येंदू शर्मा, प्रतिक गांधी, अविनाश तिवारी, उपेंद्र लिमये, छाया कदम हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत पाहायला मिळत आहेत. याशिवाय या चित्रपटात ग्लॅमरस डान्सर, अभिनेत्री नोरा फतेही झळकली आहे. या चित्रपटामुळे सध्या नोरा चर्चेत आली आहे. 'मडगांव एक्सप्रेस' या चित्रपटाच्या निमित्ताने दिव्येंदू, अविनाश आणि नोरा नुकतेच 'मॅशबल इंडियन' या युट्यूब चॅनलच्या 'द बॉम्ब जर्नी' या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी नोरा फतेहीने मुंबईतील सुरुवातीचा संघर्ष काळ सांगितला. ती म्हणाली, "जेव्हा मी भारतात पहिल्यांदा आली तेव्हा माझ्या जवळ ५ हजार रुपये होते. यावेळेस मला १०० डॉलर म्हणजे किती असतात हे अजिबात माहित नव्हतं. मी एका अपार्टमेंटमध्ये राहत होते. थ्री-बीएचके घर होतं. प्रत्येक रुममध्ये तीन मुली राहत होत्या, अशा एकूण नऊ वेड्या मुलींबरोबर मी राहत होते. हे माझ्यासाठी ट्रॉमा पेक्षा काही कमी नव्हतं. कधी कधी मला असं वाटायचं की, माझा भारतात येण्याचा निर्णय योग्य होता की चुकीचा होता."पुढे नोरा म्हणाली, "संघर्षाच्या काळात





माझ्याकडे खूप कमी पैसे होते. त्यामुळे मी फक्त अंडी आणि ब्रेड खाऊन दिवस काढले. माझ्या घराचं भाडं मी ज्या एजन्सीत काम करत होती तेच देत होते. पण माझ्या पगारातून घराचं भाडं कापलं जात होतं. त्यामुळे माझ्या हातात येणारा पगार खूप कमी होता. त्या पगारात मुंबई सारख्या शहरात राहणं खूप कठीण आहे."याआधी नोरा तिच्या संघर्षाविषयी अनेकदा बोलली होती. २०१९मध्ये एका मुलाखतीमध्ये ती म्हणाली होती, "संघर्षाच्या काळात ज्या एजन्सीत काम केलं ते आठवड्याचे फक्त तीन हजार रुपये देत होती. त्यामुळे संपूर्ण घर खर्च करून आठवड्याच्या शेवटी हातात पैसे नसायचे."दरम्यान, नोरा ही ३२ वर्षांची आहे. या वयात ती बॉलीवूडच्या आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक आहे. नोराने टेलिव्हिजनवरील अनेक डान्स रिॲलिटी शोचे परीक्षण केलं होतं. याशिवाय ती 'स्त्री', 'बाटला हाउस', 'बाहुबली द बिगनिंग', 'फ्रॅंक' यांसारख्या चित्रपटात झळकली आहे.

## अदाने नेसली चक्क 15 रुपयांची साडी

'द केरला स्टोरी' चित्रपटातील जबरदस्त अभिनयामुळे अभिनेत्री अदा शर्मा चर्चेत आली. या चित्रपटासाठी अदाला अनेक पुरस्कारदेखील जाहीर झाले आहेत. अदा अभिनयासह आपल्या वैयक्तिक आयुष्यातील गोष्टीही चाहत्यांबरोबर शेअर करत असते. अनेकदा अदाने तिच्या नानीचा म्हणजेच आजीचा उल्लेख केला आहे. 'गुलाबी साडी' या मराठमोळ्या गाण्यावर नात अदा आणि तिच्या आजीचा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला होता. अशातच अदाचा आजीशी कनेक्ट असणारा अजून एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आज अदाने खास तिच्या आजीची साडी नेसली होती. आजीची साडी नेसायची अदाची ही काही पहिलीच वेळ नाही. पण, विशेष गोष्ट म्हणजे या साडीची किंमत फक्त १५ रुपये आहे असं ती म्हणाली.

## सोनम ड्रेसमुळे झाली ट्रोल

सोनम कपूर ही फॅशन आयकॉन, फॅशन दिवा या नावांनी इंडस्ट्रीमध्ये प्रचलित आहे. अभिनयाबरोबरच ती आपल्या वेगवेगळ्या लूक्समुळे सतत चर्चेत असते. सोनमनं नुकतीच तिच्या बुक लॉंचला हजेरी लावली होती. या लॉंच सोहळ्याला सोनमने काळ्या रंगाचा ड्रेस घातला होता. तिच्या या लूकचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.सोनमच्या व्हायरल झालेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कमेंट्स करीत तिला ट्रोल केलं आहे. एकानं कमेंट करीत लिहिलं, "दारा सिंगसारखी दिसतेय." तर, "ही नाईट ड्रेसवर का फिरतेय." असं दुसऱ्या नेटकऱ्यानं कमेंट करीत लिहिलं. "हिचा ड्रेसिंग सेन्स कुठे गेला", असंही एकानं विचारलं. "सोनमनं उशांची कव्हर्स घातली आहेत, असं वाटतंय. जर कोणती गोष्ट सध्या ट्रेंडमध्ये किंवा फॅशनमध्ये असली तरी ती प्रत्येकाला शोभून दिसेल असं नसतंबॉलीवूडमधली फ्लॉप अभिनेत्री" असं एका युजरने लिहिलं. "यापेक्षा वाईट ड्रेस मी आजपर्यंत बघितला नाही.", "चालता फिरता हॅंगर", "ती हॅंगरमधून ड्रेस काढायला विसरली" अशा प्रकारच्या ट्रोल्स करणाऱ्या कमेंट्स सोनम कपूरच्या व्हिडीओवर करण्यात आल्यात.



## इंडस्ट्रीतला आऊटसायडर ते आम आदमीचा हिरो!

घरी चित्रपटाशी संबंधित कुणीही नाही, मूळ गाव मुंबानगरीपासून हजारो किलोमीटर दूर हिमाचल प्रदेशात, अल्फा मेल अर्थात पौरुष अवतारी प्रतिमा नाही, सिक्स पॅक ॲब्स नाहीत. चित्तथरारक स्टंट केल्यानंतर ललनांच्या गराड्यात वगैरेही नाही. हिंदी मालिका आणि टीव्ही सृष्टीच्या हिरोच्या पारंपरिक प्रतिमेला छेद देत पडद्यावर आम आदमी साकारुन त्यालाच नायकत्व देणाऱ्या विक्रांतचा आज वाढदिवस. टीव्ही मालिकांमध्ये काम करू लागल्यानंतर मंडळी तिथेच स्थिरावतात. पण विक्रांतने टीव्ही ते चित्रपट असं स्थित्यंतर केलं. सुरुवातीला पदरी पडलेल्या छोट्या भूमिका चोख निभावत विक्रांतने वाटचाल सुरू ठेवली. 12TH FAIL निमित्ताने विक्रांतला हिरो करणारी कहाणी पडद्यावर आली. चंबळसारख्या दुर्गम भागातून सुरुवात करून थेट प्रशासकीय अधिकारी झालेल्या मनोज शर्मा यांची कारकीर्द विक्रांतने सुरेख साकारली. याचा प्रत्यय चाहत्यांच्या प्रतिक्रिया, पुरस्कार आणि सोशल मीडियावर वाढते फॉलोअर्स यातून सिद्ध होताना दिसत आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने विक्रांतच्या सफरीचा घेतलेला धांडोळा. विक्रांतचं कुटुंब मूळचं हिमाचल प्रदेशमधील शिमल्याचं. त्याच्या वडिलांचं नाव जॉली आणि आईचं नाव आमना आहे. त्याला मोईन नावाचा मोठा भाऊ आहे. त्याच्या वडिलांचं कुटुंब ख्रिश्चन धर्म पाळतं, तर त्याच्या आईचं कुटुंब शीख आहे. विक्रांतच्या आई-बाबांनी पळून जाऊन लग्न केलं होतं, नंतर ते काही काळ विदर्भातील नागभीड इथं राहत होते.

## तापसी पन्नूच्या सिक्रेट लग्नातील पहिला व्हिडीओ

बॉलीवूड अभिनेत्री तापसी पन्नू गेल्या काही दिवसांपासून तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. जवळच्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत तिने बॉयफ्रेंड मॅथियस बोशी लग्न केल्याचं वृत्त काही दिवसांपूर्वी समोर आलं होतं. परंतु, यावर तापसीने कुठेही अधिकृतपणे भाष्य केलं नव्हतं. यामुळे नेमकं तिचं लग्न झालंय की नाही? याबाबत साशंकता निर्माण झाली होती. अशातच तिच्या लग्नातील एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने तापसी लग्नबंधनात अडकल्याचं अखेर स्पष्ट झालं आहे.जवळच्या मित्रमंडळींच्या उपस्थितीमध्ये तापसी राजस्थानमधील उदयपूरमध्ये विवाहबंधनात अडकली आहे. वरमाला विधीसाठी अभिनेत्रीने लग्नमंडपात थाटामाटात एन्ट्री घेतली होती. लाल रंगाचा भरजरी पंजाबी ड्रेस, डोळ्यावर गॉगल, हातात लग्नाचा चुडा अशा खास अंदाजात तापसी मंडपात आली होती.तापसी पन्नूने लग्नसमारंभात पंजाबी गाण्यावर एन्ट्री घेतल्याचं पाहायला मिळालं. नववधूच्या रुपात ती अतिशय सुंदर दिसत होती. तसेच मॅथियस बोने देखील यावेळी पारंपरिक लूक केला होता. एकमेकांना वरमाला घातल्यावर या जोडप्यावर सगळ्यांनी फुलांची उधळण केली. तापसीच्या लग्नातील हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर सर्वत्र व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ पाहून नेटकऱ्यांनी अभिनेत्रीवर शुभेच्छांचा वर्षाव करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, अजूनही तापसीने लग्नाबाबत कोणतंही स्पष्टीकरण दिलेलं नाही. दरम्यान, तापसी माजी बॅडमिंटनपटू मॅथियस बोबरोबर जवळपास दहा वर्षांपासून रिलेशनशिप होती. आता या जोडप्याने लग्न केलं आहे. अनुराग कश्यप आणि कनिका ढिल्लों हे दोघे तिच्या लग्नाला उपस्थित होते.



# राहुलचा कसोटी क्रिकेटला अलविदा?

## न्यूझीलंडविरुद्धच्या पराभवानंतर खेळपट्टीला केलं नमन

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर लाजिरवाणा पराभव स्वीकारल्यानंतर आता भारतीय संघाची कामगिरी, भारतीय फलंदाजांची हाराकिरी आणि पराभवाची कारणमीमांसा या गोष्टी सुरू झाल्या आहेत. भारताचा असा पराभव क्रिकेट चाहत्यांसाठी धक्कादायक ठरला. पहिल्या डावात टीम इंडियाच्या सर्वच फलंदाजांनी न्यूझीलंडच्या गोलंदाजीसमोर सपशेल शरणागती पत्करली. पण यात सर्वाधिक चर्चा होतेय ती मधल्या फळीतला फलंदाज-यष्टीरक्षक के. एल. राहुल याची! त्यात पराभवानंतर राहुलनं केलेल्या एका कृतीमुळे त्याच्या निवृत्तीच्या चर्चा रंगू लागल्या आहेत.**



एकीकडे पहिल्या कसोटीत घरच्या मैदानावर साजेशी कामगिरी करता न आल्यामुळे के. एल. राहुल तणावात असताना दुसरीकडे त्याचं कसोटी संघातलं स्थानही डळमळीत होऊ लागलं आहे. गेल्या काही काळापासून दुखापतीमुळे संघाबाहेर असणारा शुबमन गिल पुनरागमन करण्याच्या तयारीत आहे. येत्या २४ ऑक्टोबरपासून पुण्यात भारत व न्यूझीलंड यांच्यात दुसऱ्या कसोटी सामन्याला सुरुवात होत आहे. या सामन्यात के. एल. राहुल की शुबमन गिल असा प्रश्न संघ व्यवस्थापनासमोर उभा राहण्याची शक्यता आहे.पहिल्या कसोटी सामन्यात के. एल. राहुलची कामगिरी निराशाजनक ठरली. पहिल्या डावात भोपळाही फोडण्यात अपयशी ठरलेल्या राहुलला दुसऱ्या डावात इतर फलंदाजांनी धावा केल्या असताना फक्त १२ धावाच करता आल्या. वास्तविक त्याच्यानंतर आलेल्या रवींद्र जडेजालाही पाचच धावा करता आल्या. पण तरीदेखील चर्चा होतेय ती के. एल. राहुलच्या कामगिरीची. त्याची कसोटी कारकिर्दीतली सरासरी हा चिंतेचा विषय ठरतो आहे. राहुलनं आत्तापर्यंत ५३ कसोटी सामन्यांमध्ये ३३.८८ च्या सरासरीने अवघ्या २८९१ धावा केल्या आहेत. त्यामुळे राहुलला संघातून वगळलं जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, न्यूझीलंडविरुद्ध पराभव झाल्यानंतर एकीकडे टीम इंडिया निराश चेहऱ्यानं मैदानातून बाहेर पडत होती, तर दुसरीकडे के. एल. राहुलनं खेळपट्टीला हात लावून नमन केलं. त्याच्या या कृतीचा नेमका काय अर्थ होता, याबाबत अद्याप त्यानं स्वत: किंवा संघ व्यवस्थापनानं कोणतंही स्पष्टीकरण दिलेलं नाही. पण कसोटीतली त्याची धावांची सरासरी, सध्याचा फॉर्म आणि मधल्या फळीसाठी शुबमन गिल व सर्फराज खानकडून उभं राहिलेलं तगडं आव्हान या पार्श्वभूमीवर राहुलचं संघातलं स्थान अस्थिर झालं आहे. त्यामुळे तो निवृत्ती स्वीकारणार का? अशी चर्चा आता सुरू झाली आहे.दरम्यान, के. एल. राहुलच्या कामगिरीबाबत कर्णधार रोहित शर्माला विचारणा केली असता त्यानं केलेलं सूचक विधान राहुलसाठी अप्रत्यक्ष इशारा मानला जात आहे. "प्रत्येक सामन्यानंतर खेळाडूंच्या त्या सामन्यातील कामगिरीविषयी मी त्या-त्या खेळाडूशी मी बोलत नाही. प्रत्येकाला आपापली जबाबदारी माहिती माहिती आहे. त्यांना कल्पना आहे की ते त्यांच्या कारकिर्दीच्या कोणत्या टप्प्यावर उभे आहेत. एक सामना पाहून आम्ही कुठल्याही खेळाडूविषयीचं मत बदलत नाही किंवा बनवत नाही. सर्वांना माहिती आहे की संघामध्ये त्यांची जबाबदारी काय आहे", असं रोहित शर्मा म्हणाला.दरम्यान, राहुलचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर त्याच्या चाहत्यांकडून त्याच्या समर्थनार्थ पोस्ट केल्या जात आहेत. त्यावरून राहुलच्या संघातील स्थानाविषयी चर्चा सुरू झाली आहे. राहुलनं आत्तापर्यंत ५३ कसोटी सामन्यांमध्ये ३३.८८ च्या सरासरीने अवघ्या २८९१ धावा केल्या आहेत. त्यामुळे राहुलला संघातून वगळलं जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.दुसरीकडे के. एल. राहुलनं खेळपट्टीला हात लावून नमन केलं. त्याच्या या कृतीचा नेमका काय अर्थ होता, याबाबत अद्याप त्यानं स्वत: किंवा संघ व्यवस्थापनानं कोणतंही स्पष्टीकरण दिलेलं नाही. पण कसोटीतली त्याची धावांची सरासरी, सध्याचा फॉर्म आणि मधल्या फळीसाठी शुबमन गिल व सर्फराज खानकडून उभं राहिलेलं तगडं आव्हान या पार्श्वभूमीवर राहुलचं संघातलं स्थान अस्थिर झालं आहे. त्यामुळे तो निवृत्ती स्वीकारणार का? अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

### राहुलचं संघातलं स्थान अस्थिर

दरम्यान, के. एल. राहुलच्या कामगिरीबाबत कर्णधार रोहित शर्माला विचारणा केली असता त्यानं केलेलं सूचक विधान राहुलसाठी अप्रत्यक्ष इशारा मानला जात आहे. "प्रत्येक सामन्यानंतर खेळाडूंच्या त्या सामन्यातील कामगिरीविषयी मी त्या-त्या खेळाडूशी मी बोलत नाही. प्रत्येकाला आपापली जबाबदारी माहिती माहिती आहे. त्यांना कल्पना आहे की ते त्यांच्या कारकिर्दीच्या कोणत्या टप्प्यावर उभे आहेत. एक सामना पाहून आम्ही कुठल्याही खेळाडूविषयीचं मत बदलत नाही किंवा बनवत नाही. सर्वांना माहिती आहे की संघामध्ये त्यांची जबाबदारी काय आहे", असं रोहित शर्मा म्हणाला.

# दिल्ली कॅपिटल्स ऋषभ पंतला सोडणार?

## पंत आणि दिल्ली कॅपिटल्समध्ये सर्व काही ठीक नाही?

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**क्रिकेटच्या मैदानासोबतच ऋषभ पंत सोशल मीडियावरही खूप सक्रिय असतो, जिथे तो प्रत्येक सामन्यानंतर काही रील व्हिडिओ शेअर करतो. यावेळी, रील व्हिडिओ शेअर करण्याव्यतिरिक्त, पंतने एक अशी इन्स्टा स्टोरी शेअर केली आहे, ज्याने चाहत्यांचे लक्ष वेधले आहे. त्याच्या या स्टोरीने चाहते चांगलेच गोंधळात पडले आहेत. प्रत्येक चाहत्या आपापल्या पद्धतीने या स्टोरीचा अर्थ काढून अंदाज बांधत आहे.**





काय स्टोरी शेअर केली आहे? जाणून घेऊया.न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात ऋषभ पंतला दुखापत झाली होती, जिथे चेंडू त्याच्या गुडघ्याला लागला होता. यानंतर त्याला मैदान सोडावे लागले, पण त्यानंतर तो फलंदाजीला आला आणि त्याने ९९ धावांची दमदार खेळी साकारली. त्याचवेळी, पंत दुसरा कसोटी सामना खेळणार की नाही याबाबत अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. अशात त्याने इन्स्टावर शेअर केलेल्या स्टोरीने चाहत्यांच्या मनात वेगवेगळे प्रश्न निर्माण होत आहेत.सध्या ऋषभ पंतच्या फिटनेसवर लक्ष ठेवले जात आहे. विशेष म्हणजे अपघातानंतर शस्त्रक्रिया झालेल्या गुडघ्याला चेंडू लागला असल्याने चिंता वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ऋषभ पंतने आपल्या इन्स्टा स्टोरीवर कोट शेअर केला आहे, ज्यामध्ये लिहिले आहे की, 'कधीकधी शांत राहणे चांगले असते आणि देवाने लोकांना दाखवू देणे सर्वात उत्तम असते.' या स्टोरीवरुन चाहते आपापल्या पद्धतीने अंदाज बांधत आहेत. ज्यामध्ये काही चाहत्यांना वाटत आहे की, तो दुखापतीमुळे दुसऱ्या सामन्यात खेळू शकणार नाही.

### स्फोटक फलंदाज म्हणून पंतची ओळख

तसेच काही चाहत्यांना वाटत आहे की, दिल्ली कॅपिटल्स संघ यंदा आयपीएल २०२५ साठी कायम ठेवणार नसल्याने, त्यांनी अशी स्टोरी शेअर केली.ऋषभ पंतला दिल्ली कॅपिटल्स रिटेन करणार नसल्याची अटकळ मोठ्या प्रमाणात बांधली जात आहे. जे फ्रँचायझी व्यवस्थापनाचे सखोल परिणाम स्पष्ट करते. ऋषभला सोडल्यास फ्रेंचायझीचे मोठे नुकसान होऊ शकते. जागतिक क्रिकेटमधील सर्वात स्फोटक फलंदाज म्हणून पंतची ओळख आहे.